# जाहिरात

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव यांचे दैनंदीन कार्यालयीन कामकाजाकरिता जिल्ह्यांतर्गत व जिल्हा मुख्यालयाबाहेर दौऱ्याकरिता चारचाकी वाहन भाडेतत्वावर पुरवठा करणेकामी वार्षिक दरकरार करणेसाठी निविदा धारकाकडुन दरपत्रके मागविण्यात येत असुन दि. १६/०८/२०२४ ते दि.२६/०८/२०२४ पर्यंत इच्छुक निविदाधारकांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करावेत.

**दरपत्रके सादर करतेवेळी अधिकृत लेटरहेड वर खालील प्रमाणे विहित नमुन्यातच माहिती सादर करावी अन्यथा निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

| वाहनाचा तपशील | प्रति महिना भाडे<br>(२००० कि.मी. पर्यंत)<br>(दर अधिकतम मर्यादा-रु.५३०००/-) | २००० कि.मी. च्या पुढे प्रति कि.मी. दर<br>(दर अधिकतम मर्यादा-रु.१५/-प्रति कि.मी.) |
|---|---|---|
| | | |

<u>निविदाधारकांनी निविदेमध्ये भरावयाचे दर हे शासन निर्णय क्रमांक :- शासन निर्णय क्र.शापसे-३४२२/प्र.क्र.७८/कार्यासन-३१, दि.०१/०६/२०२३ मधिल विवरणपत्र अ मधिल नमूद केलेल्या वाहन प्रकार क्र.१ व २ मधिल दरांच्या मर्यादेस अनूसरुन सादर करावेत.</u>

**अटी व शर्ती:**

०१) दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक २६/०८/२०२४ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०२) सुचना फलकावरील जाहिर नोटीस प्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यात सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. दरपत्रक मोहरबंद लिफाफा "अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव" यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा, त्याच प्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर भाडेतत्वावरील खाजगी वाहन दरपत्रक लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक दरपत्रधारकाच्या नावाचा शिक्का इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

०३) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज (Docu ment) जीएसटी (GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे. त्यासोबत (१) आर.सी.बुकची छायांकित प्रत, (२) विमा प्रमाणपत्राची छायांकित प्रत, (३) जीएसटी प्राधिकृत प्रत, (४) पॅन कार्डची छायांकित प्रत, (५) अनुभव प्रमाणपत्र, (६) पी.यु.सी. प्रमाणपत्राची छायांकित प्रत, (७) परिवहन नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

०४) वाहनाची सेवा संस्थेचे अधिष्ठाता यांना इतर माध्यमातुन वाहन उपलब्ध् होईपर्यंत अथवा एक वर्षाचा कालावधी संपुष्टात येईतोपर्यंत अथवा कार्यालयाची मर्जी/असमाधानकारक सेवा असे पर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहिल. प्रथमतः सहा महिन्यांकरिता सेवा पुरवठा आदेश देण्यात येतील.

०५) वाहन दुरुस्तीस घेऊन जाताना ०२ दिवस अगोदर कार्यालयाची लेखी पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल व त्याऐवजी पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी वाहन पुरवठादार यांची राहील.

०६) वाहन चालकाची नेमणुक/ वेतन/ पर्यायी व्यवस्था या बाबी संबंधित सेवा पुरवठादार यांचेकडे असतील.

०७) वाहनावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा, न्यायालयीन प्रकरणे नसावेत.

०८) वाहनाचे लॉग बुक वाहन चालकाने अद्ययावत ठेवावयाचे असुन, संबंधीत वाहन वापरणारे अधिकारी यांची स्वाक्षरी लॉग बुक वर घेण्यात यावी. अन्यथा फिरस्ती ग्राह्य धरली जाणार नाही.

०९) कार्यालयाचे संबंधीत अधिकारी यांनी शासकीय कामकाजासाठी मुख्यालयाबाहेर प्रवास करावयाचे असल्यास तसे लेखी पत्र वाहनधारक/ वाहनचालक यांनी प्राप्त् करुन घेऊनच मुख्यालयाबाहेर प्रवास करावयाचा असुन कार्यालयाच्या लेखी परवानगी शिवाय सदरहू वाहन मुख्यालयाबाहेर प्रवासासाठी नेण्यात आल्यास त्यासंबंधीच्या देयकाची अदायगी हे कार्यालय करणार नाही.



Scanned with CamScanner

१०) वाहनाचा अनुचित प्रकार घडल्यास (पुर्वी घडलेला प्रकार असल्यास) व त्या अनुषंगाने कायदेशीर बाबी उद्भवल्यास त्याची नुकसानभरपाई करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित खाजगी वाहन पुरवठादार यांची राहील.

११) रविवार अथवा इतर सुट्टीच्या दिवशी सुध्दा आवश्यकतेनुसार वाहन वापरण्यात येईल.

१२) वाहनचालक अनुभवी व शिस्तप्रिय असावा. अयोग्य वर्तणुक/वाहतुकीचे नियम भंग केल्यास त्वरित नवीन वाहनचालकाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

१३) वाहनधारक यांना विहित नमुन्यातील रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर दरपत्रकात नमुद अटी व शर्ती सर्व मान्य् असल्याचे करार पत्र नोटरीसह कार्यालयाचे आदेश प्राप्त् करण्यापुर्वी सादर करणे आवश्यक राहील.

१४) देयकाची अदायगी (PAYMENT): वाहनधारक यांनी प्रती माह प्रमाणे देयक; लॉग बुकच्या छायांकित प्रतीसह कार्यालयात सादर करणे आवश्यक राहिल. तसेच वापरकर्ता अधिकारी यांनी देयक प्रमाणित करुन दिल्यानंतरच विहित उद्दिष्टांतर्गत अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी करण्यात येईल.

१५) <u>निविदाप्रक्रियेमध्ये पात्र झालेल्या वाहनधारकांच्या वाहनाची निवड करताना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम राहील.</u>

अ) <u>वाहन हे आधुनिक (Letest) व सर्व सुरक्षासाधानांनी सुसज्ज आहे.</u>

आ) <u>वाहनाचे Make & Model तसेच Manufacturing year अद्ययावत आहे.</u>

इ) <u>निविदाधारकांनी सादर केलेले दरांपैकी न्युनतम दर सादर करणोरे निविदाधारक.</u>

१६) वाहनधारकास आगाऊ रक्कम (ADVANCE PAYMENT) अदा करण्यात येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीतमुळे देयक अदा करण्यास झालेल्या विलंबापोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त् शुल्क/ रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही मागणी मान्य् करता येणार नाही.

१७) अपवादात्क परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त् झालेली दरपत्रके कोणतेही कारण/पुर्वसुचना न देता स्विकारणे/ नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर निविदा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

नोंद:- सदर दर पत्रके मा.अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्याची वेळ दिनांक २८/०८/२०२४ रोजी ११.३० वाजता राहिल. निविदेमध्ये सादर केलेल्या दरांनुसार वाटाघाटी करताना सहभागी सर्व निविदाधारकांनी वरील दिनांकास उपस्थित राहणे बंधनकारक असेल. तसेच काही करणास्तव नियोजित दिनांकास दरपत्रके उघडणे शक्य नसलयास नविन तारिख सर्व निविदाधारकांना कळविण्यांत येईल.

(डॉ. शिल्पा दोमकुंडवार)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव



Scanned with CamScanner